MHBI060010042023

## <u>आदेश निशाणी ०५ वर</u>

(दिनांक २७/११/२०२३)

वादीने प्रस्तुत अर्जाद्वारे प्रतिवादी यांनी मौजे जवळगाव, ता. अंबाजोगाई येथील गट क्रमांक २०३ पैकी क्षेत्र ०० एच.८२ आर जमिनीवरील वादीच्या शांततामय कब्जास हरकत अडथळा करु नये म्हणून तात्पुरता मनाई हुकूम आदेश ३९ नियम १,२ दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८, मिळणे साठी  दाखल केला आहे.

२.  मौजे जवळगाव, ता. अंबाजोगाई, जि.बीड  येथील गट क्रमांक २०३ पैकी क्षेत्र ०० एच.८२ आर ही मिळकत असुन सोईकरीता यापुढे ''वादमिळकत'' म्हणुन संबोधण्यात आली आहे.

**<u>वादीचे कथन थोडक्यात खालील प्रमाणे —</u>**

३.  वादीने असे कथन केले आहे की, वादी हा वादमिळकतीचा मालक व ताबेदार आहे. प्रतिवादीचा सदर मिळकतीशी काहीही हक्कसंबंध नसताना देखील सदर मिळकतीपैकी काही मिळकतीवर वादीच्या कब्जाला बेकायदेशिर हरकत अडथळा निर्माण करत आहे.

४.  वादीने पुढे असे कथन केले की, वादी हा वादमिळकतीमध्ये दिनांक १८. ०४.२०२३ रोजी सकाळी ११ वाजता ट्रॅक्टरने पेरणी करत असताना प्रतिवादी याने ट्रॅक्टरच्या पुढे थांबुन वादीचे नांगरणीचे काम बंद पाडले. तुझा जमीनीशी काही संबंध

नाही, तुम्ही जमीन नांगराची नाही असे म्हणुन अर्वाच्य भाषेत वादीला शिवीगाळ केली व वादीच्या कब्जे उपभोगास हरकत अडथळा केला. त्यामुळे वादीने प्रतिवादीविरुध्द प्रस्तुत दावा व तुर्तातूर्त मनाई हुकूम मिळण्याकरिता अर्ज दाखल केला आहे. वादीच्या बाजूने प्रथमदर्शनी यश असून न्यायाचा कल देखील वादीच्या बाजूने आहे. त्यामुळे वादीला वाद मिळकतीवर हरकत अडथळा केल्यास वादीचे अपरिमीत नुकसान होणार आहे. त्यामुळे प्रतिवादीवरुध्द तात्पुरता मनाई हुकूम मिळण्याची विनंती केली आहे.

५. प्रतिवादीने निशाणी १२ वर त्यांची कैफियत व सदर अर्जाचे म्हणणे दाखल केले. प्रतिवादीने त्यांच्या म्हणने मध्ये त्यांच्या शेजारी गट क्र. २०३ मधील ०० एच ८२ आर जमीनीचा मालक कोण आहे हे त्याला माहीत नसल्याचे सांगितले. एकंदरीत प्रतिवादीने वादीने केलेले सर्व आरोप नाकारले. त्याने वादीस हरकत अडथळा केला नसल्याचे सांगितले. पुढे त्यांनी असे सांगितले आहे की, वादीस कधीही हरकत अडथळा केलेला नाही त्यामुळे अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली.

६. दोन्ही पक्षांच्या परस्पर कथनांच्या आधारे खालील मुद्दे माझे निष्कर्षासाठी उपस्थित झाले, त्यांना माझे निष्कर्ष खालील कारणांसह दिलेले आहेत.

| | मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १ | वादीच्या बाजूने प्रथमदर्शनी प्रकरण आहे काय? | : | –**होय** – |
| २ | न्यायाचा समतोल वादीच्या बाजूने आहे काय ? | : | –**होय** – |
| ३ | अर्ज नामंजुर झाल्यास वादीचे अपरिमीत नुकसान होईल काय ? | : | –**होय** – |
| ४ | आदेश काय? | | अर्ज मंजुर करण्यात येतो. |

## कारणमिमांसा

**मुद्दे क्र. १ ते ३ करीता :—**

७. सर्व मुद्ये एकमेकांशी संबंधित असल्यामुळे एकत्र विचारार्थ घेतले आहेत. अर्जदारांनी त्याच्या कथनाच्या पुष्टयर्थ निशाणी ०६ वर अर्जदाराचे शपथपत्र दाखल केले. त्याच प्रमाणे कागदोपत्री पुरावा म्हणून दस्तऐवज यादी निशाणी ४ सोबत दस्त क्र. १ वर गट क्र. २०३ चा सात—बारा, गट क्र. २०३ चा नमुना ८—अ ची प्रमाणित प्रत व गट क्रमांक २०३ चा १९७६—७७ चा गाव नमुना—७ ची छायांकित प्रत दाखल केली. याउलट प्रतिवादीतर्फे कागदोपत्री पुरावा म्हणून दस्तऐवज यादी निशाणी १४ सोबत दस्त क्र. १ वर गट क्र. २०२ चा सात—बारा, गट क्र. २०२ चा नमुना ८—अ ची प्रमाणित प्रत दाखल केली.

८. अर्जदारातर्फे विधीज्ञ श्री. एस. एस. व्यवहारे आणि गैरअर्जदारातर्फे विधीज्ञ श्री. व्ही. एस. गौरशेटे यांचा युक्तीवाद ऐकला.

९. तुर्तातूर्त मनाईचा अर्ज निर्णयीत करतांना प्रथमदर्शनी बाजू, अनुकूलतेचा कल व अपरिमीत नुकसान होणार काय एवढेच पाहणे गरजेचे असते. तसेच तुर्तातूर्त व्यादेशाचा अनुतोष मिळण्याकरीता संबंधीत पक्षकाराने त्यांच्या मागणीमध्ये कायद्याचे समन्वय हे तत्व दर्शवून देणे गरजेचे असते.

१०. दस्तऐवज यादी निशाणी क्र. ४ वरील दस्तावेज क्र. १ वरील गट क्र. २०३ चा सात—बारा, गट क्र. २०३ चा नकाशा ८—अची छायांकित प्रत चे अवलोकन केले असता वादीचे नाव मालक व भोगवटादारच्या रकान्यात असल्याचे दिसुन येते. त्यामुळे त्यामधील तथ्या व कथनाबाबत व त्याच्या निष्पादनाबाबत खरेपणाचे गृहितक निर्माण होत आहे. तसेच वादी विरुध्द जाईल असा पुरावा

प्रतिवादीने न्यायालयीन अभिलेखावर सादर केलेला नाही. त्यामुळे वरील कागदोपत्री पुरावा प्रथमदर्शनी वादीचा वादमिळकतीत ताबेकब्जा असल्याचे प्रथमदर्शनी स्पष्ट करतो. त्यामुळे वादीने सादर केलेले कागदपत्रे प्रथमदर्शनी आजपावेतो अभेदय राहिलेल्या आहेत व त्या वादीच्या कथनाला सकृतदर्शनी जोड देत आहेत.

११. महाराष्ट्र जमीन महसुल संहिता १९६८ चे कलम १५७ नुसार हक्क नोंदीतील नोंदी जोपर्यंत नाशाबीत होत नाहीत तो पर्यंत खरे असल्याचे गृहित धरावयाचे आहे. हक्क नोंदी कर निर्णायक पुरावा नसेल तर त्यास गृहितकारी पुरावा म्हणून वापरण्यात येतो. भक्कम साक्षीपुराव्याच्या आभावे जेंव्हा गृहित धरलेले हे सत्य नाशाबीत होईल तेंव्हाच या नोंदी ची पुरावा म्हणून किंमत शुन्य होते. त्यामुळे सदर कागदपत्रातील नोंदीविषयी गृहितक आहे. ज्याक्षणी त्या कागदपत्रा विरूध्द जाईल असा कागदापत्री पुरावा न्यायालयासमोर येईल त्यावेळी त्या कागदपत्रांना महत्व प्राप्त होणार नाही. प्रतिवादीने उपरोक्त महसुल कागदपत्रावर संशय निर्माण होईल किंवा त्यातील नोंदी विरूध्द जाईल असा कोणताही विरूध्द पुरावा किंवा कागदपत्र न्यायालयीन अभिलेखावर दाखल केले नाहीत. त्यामुळे वादीने सादर केलेले कागदपत्रे प्रथमदर्शनी व त्यातील नोंदी आजपावेतो अभेदय राहिलेल्या आहेत व त्या वादीच्या कथनाला सकृतदर्शनी जोड देत आहेत.

१२. वादी यांनी दाखल केलेले दस्तावेज व त्यांच्या युक्तीवादाचा विचार करता, न्यायालयीन अभिलेखावर उपलब्ध असलेले दस्तावेज हे वादीच्या बाजूने झुकत असून कायदेशीर बाबीदेखिल वादग्रस्त मिळकत ही वादीच्याच कब्जात असल्याचे प्रथमदर्शनी दर्शवितात. त्यामुळे वादीने त्याच्या कथनात समन्याय हे तत्व दर्शवून दिले आहे. अर्जात प्रथमदर्शनी यश वादीस दिसून येत असून अनुकूलतेचा कल देखिल वादीच्या बाजूने झुकत आहे. वादग्रस्त मिळकतीवर प्रतिवादीचा कोणताही हक्कसंबंध दिसून येत नाही. अशा परिस्थितीत वादी हा प्रतिवादी विरूध्द तुर्तातूर्त मनाई हुकूम

मागण्यास पुर्णत: हक्कदार आहे. तुर्तातूर्त मनाई हुकूम न दिल्यास वादीचे कधीही न भरून येणारे नुकसान होण्याची शक्यता आहे. त्यामुळे मुद्दे क्र. १ ते ३ चे निष्कर्ष मी होकारार्थी नोंदवित आहे व मुद्दा क्र. ४ च्या अनुशंगाने खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज निशाणी क्र. ५ मंजुर करण्यात आला आहे.

२. वादमिळकतीवरील वादीच्या शांततामय कब्जे वहिवाटीस व उपभोगास प्रतिवादीनी अथवा त्यांच्या वतीने इतर कोणीही सदर दाव्याचा निकाल लागेपावेतो कोणतीही हरकत व अडथळा करु नये असा तुर्तातुर्त व्यादेश वादीच्या हक्कात व प्रतिवादीविरुध्द पारीत करण्यात येतो.

**SD/-**
(बा. ना. गोडबोले)
दिनांक : २७/११/२०२३ ४ थे सह दि.न्या.क.स्तर, अंबाजोगाई